Imp letter/Document.

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग

आदेश क्र.मुमाआ-२०११/प्र.क्र.६२/०१
१३ वा मजला, नविन प्रशासकीय भवन,
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ३२
दिनांक २९ जुलै २०११

## आदेश

सद्य:स्थितीत राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत बृहन्मुंबईतील कार्यालयांच्या संदर्भात प्राप्त झालेली व्दितीय अपीले व तक्रारींची सुनावणी मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र व राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडून घेण्यात येते. सदर पध्दतीमध्ये सुसूत्रता असावी या दृष्टीकोनातून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत बृहन्मुंबईतील कार्यालयाच्या संदर्भात प्राप्त होणा-या व्दितीय अपीले व तक्रारींची सुनावणी घेण्यासाठी राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्यात प्रशासकीय विभागांचे वाटप पुढील प्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र | | राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई |
|---|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन विभाग, | १ | नगर विकास विभाग |
| २ | गृह विभाग, | २ | गृहनिर्माण विभाग |
| ३ | वित्त विभाग, | ३ | कृषी व पदुम विभाग |
| ४ | महसूल व वन विभाग | ४ | नियोजन विभाग |
| ५ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ५ | पर्यावरण विभाग |
| ६ | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | ६ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग |
| ७ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | ७ | आदिवासी विकास विभाग |
| ८ | ग्राम विकास व जलसंधारण विभाग | ८ | महिला व बाल विकास विभाग |
| ९ | जलसंपदा विभाग | ९ | सामाजिक न्याय विभाग |
| १० | विधी व न्याय विभाग | १० | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग |
| ११ | सार्वजनिक आरोग्य विभाग | ११ | रोजगार व स्वयंरोजगार विभाग |
| १२ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | १२ | अल्पसंख्याक विभाग |
| | | १३ | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| | | १४ | अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग |
| | | १५ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग |
| | | १६ | मराठी भाषा विभाग |
| | | १७ | सांसदीय कार्य विभाग |

वरील विभाग वाटपानुसार संबंधित प्रशासकीय विभाग व त्या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली येणारी बृहन्मुंबईस्थित सर्व कार्यालये / महामंडळे यांच्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त होणा-या व्दितीय अपीले, तक्रारी व इतर तदनुषंगीक बाबी यांच्या सुनावण्या / कार्यवाही ही वरीलप्रमाणे संबंधित माहिती आयुक्तांमार्फत करण्यात येईल.

सदर कार्यपध्दती ही अर्जदार बृहन्मुंबई क्षेत्रातील रहिवासी असेल व अर्जदाराने महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुंबई यांच्याकडे व्दितीय अपील / तक्रार दाखल केली असेल तर अशा अपीले / तक्रारी संदर्भातील लागू होतील. अर्जदार बृहन्मुंबई व्यतिरिक्त महाराष्ट्रातील अन्य ठिकाणचा रहिवासी असल्यास सदर प्रकरणी आयोगाच्या दि.२५.०४.२०११ च्या आदेशानुसार ठरविण्यात आलेली कार्यपध्दती लागू राहिल.

C:\Documents and Settings\Acer OEM User\My Documents\Doc\Gaikwad\Letter.doc

वरील विभाग वाटपाव्यतिरिक्त मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार अपीले व तक्रारी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाकडे सोपविण्यात येतील.

वरील विभाग वाटपानुसार राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे टपाल स्वतंत्ररित्या स्विकारण्यासाठी उचित व्यवस्था करावी.

सदर कार्यपध्दती तात्काळ प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

सदर आदेश मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

रो.प्र.जाधव
(कक्ष अधिकारी)

प्रत,

१.महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (का.१ व २)

२.राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई

३.निवडनस्ती.

C:\Documents and Settings\Acer OEM User\My Documents\Doc\Gaikwad\Letter.doc